सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान

वर्ष १ ले | अंक : १४९ | गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## माझा संकल्प–भूमी सुपोषण चळवळ जनजागर

# महाशोभायात्रेस अभूतपूर्व प्रतिसाद

## समाजातील सर्वच घटकांसह माता–भगिनींनीही नोंदविला उत्स्फूर्त सहभाग

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : कृषी क्षेत्रातील अग्रगण्य सेवाभावी संस्था अक्षय कृषी परिवार व येथील मंगळग्रह सेवा संस्था यांच्यातर्फे 'माझा संकल्प–भूमी सुपोषण चळवळी'साठी जनजागर व्हावा, याकरिता बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी शहरातून भव्य महाशोभायात्रा काढण्यात आली. या महाशोभायात्रेस अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. समाजाजील सर्वच घटकांनी यात सहभाग नोंदविला. त्यात विविध महिला संघटना, शाळा–महाविद्यालयांतील विद्यार्थी– विद्यार्थिनी तसेच वारकरी संप्रदायातील प्रतिनिधींनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला, हे विशेष!**

संतश्री संखाराम महाराज वाडी संस्थानापासून सकाळी ८ वाजता महाशोभायात्रेचा प्रारंभ झाला. संतश्री प्रसाद महाराज यांनी महाशोभायात्रेचे उद्घाटन केले. अक्षय कृषी परिवाराचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे व प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी श्री भूमीमातेचे पूजन केले. तत्पूर्वी, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त श्रीमती जयश्रीताई साबे, डी. ए. सोनवणे, आनंद महाले, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, मंगल सेवेकरी विनोद कदम, प्रकाश मेखा, आशिष चौधरी, निलेश महाजन, बाळा पवार, अमोल महाजन व दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाशोभायात्रा मार्गस्थ झाली. सराफ बाजार, तिरंगा चौक, कोंबडी बाजार, हॉटेल पायल, सुभाष चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, मोठा बाजार, दगडी दरवाजा, फरशी रोडमार्गे श्री मंगळग्रह मंदिरात महाशोभायात्रेची सांगता झाली. महाशोभायात्रेतील सहभागींकरीता मंगळग्रह सेवा संस्थेने नाश्ता, चहा–पान व भोजनाची व्यवस्था केली होती.

### यांचा होता सक्रिय सहभाग

प्रताप महाविद्यालय, सावित्रीबाई कन्या शाळा, लोकमान्य विद्यालय, एन. टी. मुंदडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, विजयनाना पाटील आर्मी स्कूल, जी. एस. हायस्कूल, साने गुरुजी विद्यालय, एम. एस. मुंदडा विद्यालय (माळीवाडा), कळमसरे मुलांची जि. प. शाळा, लायन्स व रोटरी क्लब, जायन्ट्स ग्रुप, महिला हौसिंग सोसायटी (गुजरात), फुलराणी ग्रुप, आशा स्वयंसेविका आदींसह विविध सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.



***अमळनेर : माझा संकल्प– भूमी सुपोषण चळवळ जनजागर महाशोभायात्रेचा बुधवारी संतश्री सखाराम महाराज वाडीत हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करताना संतश्री प्रसाद महाराज. शेजरी मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, अक्षय कृषी परिवाराचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे, दशरथ लांडगे, खजिनदार गिरीश कुळकर्णी, सुरेश बाविस्कर, उदय देशपांडे आदी.***

(आणखी छायाचित्रे : पान ३ वर)

### घोषवाक्यांद्वारे जनजागृती

माती जपा–पाणी वाचवा, एक मूठ माती राष्ट्रासाठी, रासायनिकमुक्त शेती–हीच खरी देशभक्ती, जपूया माती–घडवूया समृद्धी, मातीची पूजा–राष्ट्राची सेवा, रासायनिक शेती सोडा–सेंद्रीय शेती जोडा, भूमी वाचवा–भविष्य घडवा, भूमी सुपोषण चळवळ महान, शेतकरी वाचला तर देश वाचला, एच ध्यास–मृदा विकास आदी घोषवाक्यांद्वारे जनजागृती करण्यात आली.

### या मान्यवरांची लाभली उपस्थिती

महाशोभायात्रेत उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, खान्देश शिक्षण मंडळाचे चेअरमन नीरज अग्रवाल, संचालक पंकज मुंदडे, योगेश मुंदडे, लायन्स क्बलचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, मनीष जोशी, नितीन विंचूरकर, डॉ. रवींद्र कालरा, डॉ. मिलिंद नवसारीकर, डॉ. धीरज कोकाटे, प्रीतेश पारख, प्रकाश जैन, अभिनय मुंदडा, माळी समाजाचे अध्यक्ष मनोहर महाजन, लिनेस क्लबच्या डॉ. मयूरी जोशी, सोनल जोशी, कविता पारख, यजदी भरुचा, प्रदीप जैन, सुनील चौधरी, राजेश कुंदनानी व सूरज वरलानी, महावीर पहाडे, रमेश जीवनानी, दशरथ लांडगे, श्रमसाफल्य एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष अभिजीत भांडारकर, नगरसेवक राजू फापोरेकर, महेश कोठावदे, विवेक देशमुख, शिरीष डहाळे, माजी नगरसेवक संजय पाटील, डॉ. महेश पाटील, संदीप महाजन, प्रा. पी. आर. भावसार आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

### आमदार अनिलदादा पाटलांनी वाढविला उत्साह




आमदार अनिलदादा पाटील यांनी महाशोभायात्रेस भेट दिली. याप्रसंगी त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास माल्यार्पण केले. महाशोभायात्रेतील सहभागींना भेटून त्यांचे कौतुक केले. तसेच उघड्या जीपमधून संपूर्ण महाशोभायात्रेची पाहणी करून महाशोभायात्रेतील सहभागींचा उत्साह वाढविला. याप्रसंगी ठिकठिकाणी महाशोभायात्रेचे शहरातील नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.




विविध महिला मंडळांतील नऊवारी साडीतील कलशधारी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. विद्यार्थी– विद्यार्थिनींनी केलेल्या महापुरुषांच्या वेशभूषेनेही साऱ्यांचे लक्ष वेधले. महाशोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करण्यात आला. तसेच विविध मान्यवरांच्या पुढाकारातून महाशोभायात्रेतील उपस्थितांना चॉकलेट, बिस्कीट, वेफर्स, पाणी बॉटल वाटप करण्यात आले.




### श्री भूमीमाता रथाने वेधले लक्ष

सजविलेल्या पालखीत श्री मंगळग्रह देवतेची पंचधातूंची उत्सवमूर्ती ठेवण्यात आली होती. श्री भूमीमाता रथाने अमळनेरकरांचे लक्ष वेधले. तसेच विविध लेझीम पथके, ढोल पथक, संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानाच्या वेदपाठशाळेतील बाल वारकरी, तालुक्यातील विविध भजनी मंडळांनी महाशोभायात्रेत सहभाग नोंदविला. शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थी– विद्यार्थिनी, कृषी क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मंडळे, हरिभक्त परायण भजनी मंडळ, ढोल–ताशे, टाळ–मृदुंगाच्या गजराने शहरातील वातावरण मंगलमय झाले होते.

**छायाचित्रे : मयूर चौधरी**



संपादकीय

# कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी–मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी–बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. यावर्षी बारावीची बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू झाली असून, ती ११ मार्चला संपणार आहे. तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी–बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधकपणे सामोरे जातात. मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग कॉपी. दहावी–बारावीच्या परीक्षेत दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते. मात्र कॉपीची ही कीड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागलेली कीड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले होते.

मागील वर्षी मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही, असा कानमंत्र दिला होता. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो. मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही, असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला होता. मात्र विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांचा हा संदेश अमलात आणला नाही, असेच म्हणावे लागेल. कारण सध्या चालू असलेल्या बारावीच्या परीक्षेत राज्यातील अनेक भागांत मास कॉपी झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. बीड, जालना यासारख्या शहरात कॉपीमुक्त परीक्षा या शिक्षण विभागाच्या अभियानाला हरताळ फासला गेला. अनेक परीक्षा केंद्रांवर विद्यार्थी कॉपी करताना आढळले. काही परीक्षा केंद्रांवर मास कॉपी होत असल्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. या प्रकरणी काही पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांवर शिक्षण विभागाने कारवाई देखील केली आहे. दहावी–बारावी परीक्षेत कॉपी होऊ नये यासाठी शिक्षण विभाग विविध पावले उचलत असताना विद्यार्थ्यांकडून त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही, असेच म्हणावे लागेल. दरवर्षी कॉपी करणाऱ्या मुलांची संख्या वाढतच चालली आहे.

वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरविण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉलच्या बाहेर कॉपी पुरविण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करते हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबविले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रांवर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रांवर धाक बसवितात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला, तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही. मात्र देशातील काही राज्यांत कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठविण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्य सरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्य सरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले, तरी कठोर कायदे करूनच कॉपीला आळा घालता येईल असे नाही, तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो. मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात. त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे, तर कठोर मेहनतच घ्यावी लागते.

# छत्रपती शिवाजी महाराज : स्वराज्याचे शिल्पकार

जयंती विशेष



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय इतिहासाच्या सुवर्णपानांवर तेजस्वी अक्षरांनी कोरलेले नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. त्यांची गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी जयंती. त्यानिमित्त आपण केवळ एका पराक्रमी राजाचा नव्हे, तर दूरदृष्टी असलेल्या राष्ट्रपुरुषाचा, लोकाभिमुख राज्यकर्त्याचा आणि आदर्श व्यक्तिमत्त्वाचा स्मरणोत्सव साजरा करतो. स्वराज्य ही संकल्पना प्रत्यक्षात आणणारे आणि सामान्य जनतेला सन्मान, सुरक्षा व स्वाभिमान देणारे शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अद्वितीय व्यक्तिमत्त्व होय.

### जन्म व बालसंस्कार

शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या आई जिजाबाई यांनी त्यांच्यावर बालपणापासूनच संस्कारांची शिदोरी दिली. रामायण, महाभारत आणि संतवाङ्मयातील आदर्श त्यांच्या मनावर बिंबविले. वडील शहाजी राजे भोसले यांच्या शौर्यपरंपरेचा वारसा आणि जिजाऊंच्या राष्ट्राभिमानी विचारांचा संगम शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

### स्वराज्याची स्थापना

त्या काळात भारतात मोगल आणि आदिलशाही यांचे वर्चस्व होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्य' ही संकल्पना मांडली. तोरणा, राजगड, प्रतापगड यांसारखे किल्ले जिंकून त्यांनी स्वराज्याची पायाभरणी केली. अफजलखानाचा पराभव आणि शिस्तबद्ध गनिमी काव्याच्या रणनीतीमुळे त्यांनी शत्रूंना चकित केले.

### राज्याभिषेक आणि सुशासन

६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा भव्य राज्याभिषेक झाला. या सोहळ्याने स्वराज्याला औपचारिक मान्यता मिळाली. महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून सुयोग्य प्रशासन उभारले. न्यायव्यवस्था पारदर्शक, महसूल व्यवस्था शिस्तबद्ध आणि लष्कर संघटित होते. शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि सर्वसामान्य प्रजा यांच्या हिताचे धोरण त्यांनी राबविले.

### स्त्रीसन्मान आणि धर्मनिरपेक्षता

शिवाजी महाराजांच्या कारभारातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्त्रियांचा सन्मान. युद्धात शत्रूपक्षातील स्त्रियांचा अपमान होऊ नये, अशी कठोर आज्ञा त्यांनी दिली होती. सर्व धर्मांप्रती आदराची भूमिका त्यांनी घेतली. मशिदी, दरगाह यांना त्यांनी संरक्षण दिले. त्यामुळे त्यांच्या राज्यात सर्वधर्मसमभावाची भावना दृढ झाली.

### आरमार आणि संरक्षणव्यवस्था

शिवाजी महाराजांनी सागरी सामर्थ्याचे महत्त्व ओळखून आरमार उभारले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग यांसारखे सागरी किल्ले बांधून त्यांनी किनारपट्टी सुरक्षित केली. परकीय सत्तांविरुद्ध त्यांनी सशक्त संरक्षणव्यवस्था निर्माण केली.

### प्रेरणादायी वारसा

शिवाजी महाराजांचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यांच्या स्वराज्याच्या विचाराने पुढील अनेक स्वातंत्र्यलढ्यांना प्रेरणा दिली. शौर्य, धैर्य, संघटनकौशल्य, दूरदृष्टी आणि लोकहिताची बांधिलकी हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आजही प्रेरणादायी आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक योद्धा नव्हते, तर लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि राष्ट्राभिमानी राजा होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा आणि आदर्शांचा अंगीकार करून समाजनिर्मितीच्या कार्यात योगदान देणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**छत्रपती शिवाजी महाराज यांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे मानाचा मुजरा..!**

'जय भवानी, जय शिवाजी!'

# आपण रोज 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!' म्हणतो, गारदीतल्या प्रत्येक शब्दाचा अर्थ आपल्याला माहीत आहे का?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



महाराजाधिराज, राजा शिवछत्रपती, सिंहासनाधीश्वर, गडपती, प्रौढप्रतापपुरंदर या फक्त उपाधी नव्हत्या, तर त्या होत्या स्वराज्याच्या सामर्थ्याची साक्ष. शिवरायांच्या गारदीमागचे खरे वैभव आणि अर्थ समजून घेणे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. तसेच शिवजन्मोत्सव सोहळ्याचे विशेष महत्त्वही लक्षात घेणे आवश्यक आहे. इतिहास वाचून स्वस्थ न बसता तो अनुभवण्यासाठी शिवसृष्टीला नक्की भेट द्यायला हवी. छत्रपती शिवरायांची गारद ऐकलीय, पण तिचा खरा अर्थ काय? हेही लक्षात घ्यावे.

### गारद म्हणजे काय ?

शिवाजी महाराज दरबारात प्रवेश करताना जी घोषणा किंवा ललकारी दिली जात होती तिला मराठीत 'गारद' असे म्हटले जाते. गारदेला संस्कृतमध्ये 'बिरुद किंवा बिरुदावली' तर उर्दू भाषेत 'अल्काब' असे म्हणतात.

### गारद कोण देतात ?

गारद देणाऱ्यांना गारदी म्हणतात. छत्रपती शिवरायांची गारद आणि त्यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ
गडपती गडकोटांचे अधिपती, राज्यातील गडकोटांवर ज्यांचे अधिपत्य (राज्य) आहे असे महाराज.

### गजअश्वपती

ज्यांच्याकडे स्वतःच्या मालकीचे हत्ती व घोड्यांचे दल आहे असे महाराज.

(त्याकाळी हत्ती हे वैभवाचे प्रतीक समजले जायचे म्हणून गजअश्वपती, हा शब्द वैभवसंपन्नतेचे प्रतीक होता, असे म्हणता येईल.)

### भूपती– प्रजापती

वास्तविक राज्याभिषेक म्हणजे राज्यकर्त्याचा भूमीशी झालेला विवाह आहे, म्हणजेच ज्यांनी राज्यातील भूमीचे व प्रजेचा पती हे पद स्वीकारले आहे आणि त्यांचे सर्वथा रक्षण करणे; हे ज्या राज्यकर्त्याचे प्रथम कर्तव्य आहे, असे महाराज. सुवर्णरत्न श्रीपती राज्याच्या खजिन्यातील वेगवेगळे हिरे, माणिक, मोती आणि स्वर्ण (सोने) यावर ज्यांचे अधिपत्य (मालकी) आहे असे महाराज (शिवरायांच्या बाबतीत ३२ मण सुवर्णसिंहासनाचे अधिपती).

### अष्टवधानजागृत

आठही प्रहर जागृत राहून राज्याच्या आठही दिशांवर लक्ष असणारे महाराज.

### अष्टप्रधानवेष्टीत

ज्यांच्या पदरी प्रत्येक शास्त्रात निपुण असलेले आठ प्रधान आहेत आणि राज्यकारभारात जे त्यांचा सल्ला घेतात असे महाराज.

### न्यायालंकारमंडीत

कर्तव्यकठोर आणि न्यायकठोर राहून सत्याच्या व न्यायाच्या बाजूने निकाल देणारे महाराज.

### शस्त्रास्त्रशास्त्रपारंगत

सर्व प्रकारच्या शस्त्रविद्या व शास्त्रात पारंगत असलेले महाराज.

### राजनीतीधुरंधर

आदर्श राज्यकर्त्याप्रमाणे राजकारणाच्या डावपेचांमध्ये (राजनीतीमध्ये) तरबेज असलेले महाराज.

### प्रौढप्रतापपुरंदर

मोठे शौर्य गाजवून ज्यांनी आपल्या पराक्रमाचा ठसा उमटवला आहे, असे महाराज.

### क्षत्रिय कुलवतंस

क्षत्रिय कुळात जन्म घेऊन त्या कुळाचे सर्वांत श्रेष्ठ व्यक्ती व क्षत्रिय कुळाचे शिरोभूषण असलेले महाराज.

### सिंहासनाधिश्वर

जसा देव्हाऱ्यातील देव (अधिश्वर) असतो तसेच ३२ मण सुवर्णसिंहासनावर शोभून दिसणारे सिंहासनाचे अधिश्वर असे महाराज.


### महाराजाधिराज

विद्यमान सर्व राजांमध्ये जो सर्वांत मोठा आहे आणि साऱ्या राजांनी ज्यांच्या अधिपत्याखाली राहण्याचे स्वीकारायला हवे असे महाराज.

### राजाशिवछत्रपती

ज्यांच्यावर सुवर्णाची छत्रचामरे ढळत आहेत किंवा प्रजेने छत्र धरून ज्यांना आपला अधिपती म्हणून स्वीकारले आहे किंवा ज्याच्यावर प्रत्यक्षात नभानेच छत्र धरले आहे, असे छत्रपती शिवाजी महाराज.

## आजचे अभीष्टचिंतन





श्री. हरिक्रिष्ण सोनी (लालाजी)
अमळनेर



सौ. भावना देसले
अमळनेर



श्री. संतोष पाटील
सामाजिक कार्यकर्ता



डॉ. श्री. विशाल बडगुजर
अमळनेर

## दिनविशेष


१९ फेब्रुवारी

- रस्सीखेच दिवस
- केंद्रीय मंत्रिमंडळाने तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातींवर पूर्णपणे बंदी घालण्याच्या विधेयकाला मान्यता दिली.
- छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मदिवस.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

### गोविंदा 'डान्स मास्टरचा गोंधळ'



एकदा कोरिओग्राफरने गोविंदाला सांगितले, की सर, थोडे स्लो स्टेप घ्या. गोविंदा म्हणाला, की मी स्लो झालो तर सिनेमा फ्लॉप होईल. त्याच्या जोकवर सर्व जण नाच थांबवून हसले.

# राष्ट्रसेवेची प्रेरणा : गोपाळकृष्ण गोखले

पुण्यतिथी विशेष

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील उदारमतवादी, संयमी आणि दूरदर्शी नेते म्हणून ओळखले जाणारे गोपाळकृष्ण गोखले राष्ट्रसेवेच्या आदर्शाची आठवण करून देतात. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा ठसा भारतीय राजकारणावर आजही उमटलेला दिसतो. त्यांच्या पुण्यतीथीनिमित्त त्यांच्या कार्याला दिलेला थोडक्यात उजाळा.

गोपाळकृष्ण गोखले यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कोटलूक या गावात झाला. अत्यंत साध्या कुटुंबातून आलेल्या गोखले यांनी शिक्षणाच्या बळावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. ते पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. गणित आणि अर्थशास्त्र या विषयांवर त्यांची पकड मजबूत होती. शिक्षणक्षेत्रात काम करत असतानाच त्यांना समाजकारणाची ओढ लागली आणि ते सार्वजनिक जीवनात सक्रिय झाले.
गोखले हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अग्रगण्य नेते होते. त्यांनी ब्रिटिश सरकारसमोर भारतीयांच्या हक्कांसाठी घटनात्मक मार्गाने, शांततामय आणि तर्कशुद्ध पद्धतीने लढा दिला. त्यांचा विश्वास होता, की सुधारणा आणि स्वराज्य हे शिक्षण, संवाद आणि संयम यांच्या आधारे मिळविता येते. त्यामुळे ते उदारमतवादी विचारसरणीचे प्रमुख नेते म्हणून ओळखले गेले.

१९०५ मध्ये त्यांनी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश देशसेवेसाठी प्रशिक्षित आणि निस्वार्थी कार्यकर्ते घडवणे हा होता. समाजातील शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुधारणा यासाठी कार्य करणारी ही संस्था पुढे राष्ट्रीय चळवळीला बळ देणारी ठरली. गोखले यांना वाटत होते, की राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक जागृतीही तितकीच महत्त्वाची आहे.
गोखले यांचे अर्थसंकल्पावरील भाषण विशेष गाजले. त्यांनी ब्रिटिश सत्तेच्या आर्थिक धोरणांवर कठोर टीका केली आणि भारतातील दारिद्र्य, करभार व आर्थिक विषमता याविषयी प्रभावी मांडणी केली. त्यांची वक्तृत्वशैली तर्कशुद्ध, संतुलित आणि प्रभावी होती. ब्रिटिश संसदेसमोरही त्यांनी भारतीयांचे प्रश्न मांडले.

महात्मा गांधींवर गोखले यांचा मोठा प्रभाव होता. गांधीजींनी गोखले यांना आपले राजकीय गुरु मानले होते. दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतल्यानंतर गांधीजींनी गोखले यांच्याकडून देशाची राजकीय परिस्थिती समजून घेतली. गोखले यांच्या संयम, सहिष्णुता आणि नैतिकतेच्या भूमिकेचा प्रभाव गांधीजींच्या पुढील कार्यपद्धतीत स्पष्ट दिसून येतो.
गोपाळकृष्ण गोखले यांचे जीवन म्हणजे निष्ठा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रप्रेम यांचे प्रतीक होते. त्यांनी कधीही आक्रमक किंवा हिंसक मार्ग स्वीकारला नाही. त्यांचा विश्वास लोकशाही मूल्यांवर आणि घटनात्मक सुधारणांवर होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतात राजकीय जागृती वाढली आणि स्वातंत्र्यलढ्याची पायाभरणी अधिक मजबूत झाली.

आजच्या काळात गोखले यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. मतभेद असले तरी संवाद, संयम आणि तर्कशुद्ध विचारांच्या माध्यमातून समस्यांचे निराकरण करता येते, हा त्यांचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. समाजातील विषमता, शिक्षणातील तफावत आणि नैतिक मूल्यांची घसरण यांसारख्या प्रश्नांवर उपाय शोधताना गोखले यांचे आदर्श प्रेरणादायी ठरतात.

गोपाळकृष्ण गोखले यांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण त्यांच्या कार्याला अभिवादन करतो. राष्ट्रहितासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या या महान नेत्याच्या स्मृती आपण जपल्या पाहिजेत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात योगदान देणे, हेच त्यांच्या पुण्यतिथीचे खरे औचित्य आहे.

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी

एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com




































(छायाचित्रे : मयूर चौधरी, रॉकी पवार)




## गुरुवारी नक्की काय करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुरुवार हा भगवान विष्णू, दत्तगुरू आणि बृहस्पतींचा वार मानला जातो. या दिवशी पिवळ्या रंगाचे कपडे परिधान करून भगवान विष्णू-लक्ष्मी माता यांची पूजा, गुरुचरित्र किंवा तारक मंत्राचे पठण करणे शुभ असते. पिवळ्या वस्तूंचे दान (गूळ-फुटाणे, पिवळी फुले, पेढे), तुळशीची पूजा आणि आर्थिक लाभासाठी लक्ष्मीपूजन करणे अत्यंत फायदेशीर मानले जाते.

**गुरुवारी करायच्या विशेष सेवा**

**विष्णू आणि लक्ष्मी माता यांची पूजा :** भगवान विष्णूंची विधिवत पूजा करावी आणि तुळशी मातेला पिवळे वस्त्र किंवा हळद अर्पण करावे.

**गुरुचरित्र पठण :** गुरुचरित्राचे पारायण करावे. विशेषतः १४ व्या आणि १८ व्या अध्यायाचे वाचन लाभदायक आहे.

**श्री स्वामी समर्थ सेवा :** श्री स्वामी समर्थांच्या मूर्तीचा/फोटोचा अभिषेक करावा आणि ११ माळी जप करावा.

**पिवळ्या वस्तूंचे दान :** गुरुवारी पिवळ्या रंगाचे वस्त्र, अन्न किंवा फळे दान करावे.

**दत्त सेवा :** गुरुवारी गोमातेला अन्नदान करावे.

गुरुवारी काय करावे आणि काय टाळावे?

**काय करावे :** पिवळे वस्त्र परिधान करणे, हळदीच्या पाण्याने स्नान, केशराचा टिळक लावणे.

**टाळावे :** नखे कापणे, केस धुणे, दाढी करणे आणि केस कापणे टाळावे.

**आर्थिक बाब :** गुरुवारी कोणालाही उधार पैसे देणे टाळावे.

# श्री स्वामी समर्थांची जागृत स्थाने कोणती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री स्वामी समर्थ महाराज यांची जागृत स्थाने खालीलप्रमाणे आहेत. त्यात श्री गुरु दत्तात्रेय, श्रीपादवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती, श्री स्वामी समर्थ महाराज यांचा समावेश असून, त्यांचे जन्मस्थान व निवासक्षेत्रांचीही आपण माहिती जाणून घेऊया.

### १) श्री गुरु दत्तात्रेय

माता पिता - अनसूया/अत्रि.
जन्म स्थान - माहुर (नांदेड)
निवासक्षेत्र - गिरनार (गुजराथ)
वेष - अवधूत
जयंती - मार्गशीर्ष शु.१५

### २) श्रीपादवल्लभ

माता पिता - सुमती/अप्पलराज.
जन्मस्थान - पिठापूर (आंध्र प्रदेश)
निवासक्षेत्र - कुरगड्डी (कुरवपूर) कर्नाटक.
वेष - ब्रह्मचारी
जयंती - भाद्रपद शु. ४

### ३) श्रीनृसिंह सरस्वती

माता पिता - अंबा./माधव.
जन्मस्थान - लाड कारंजा (वाशीम महाराष्ट्र)
निवासक्षेत्र - नरसोबावाडी, औदुंबर गाणगापूर.
वेष - संन्यासी
जयंती - पौष शु. २

### ४) श्री स्वामी समर्थ

श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या जन्माविषयी ठोस माहिती उपलब्ध नाही. (भक्त परंपरेनुसार ते दत्तात्रय यांचे अवतार मानले जातात.)
जन्मस्थान - कर्दळीवनात वारुळातून प्रगट.
निवासक्षेत्र - अक्कलकोट (२४ वर्षे)
वेष - संन्यासी दिगंबर
जयंती - चैत्र शु. २

पिठापूर, कुरवपूर, कडगंची, गाणगापूर व अक्कलकोट श्री स्थाने अतिशय पवित्र व जागृत आहेत. कुरवपूर येथे तर साक्षात श्रीपादवल्लभांनी १४ वर्षे अनुष्ठान केले आहे. ही जागा नामस्मरण, पारायणासाठी खूप चांगली आहे. पादुका दर्शन हा दत्त संप्रदायामधील एक अत्यंत वेगळा अनुभव आहे.



### विविध श्री दत्त क्षेत्री विविध प्रकारच्या पादुका

१) श्री विमल पादुका = औदुंबर
२) श्री मनोहर पादुका = वाड़ी
३) श्री निर्गुण पादुका = कारंजा
४) श्री निर्गुण पादुका = गाणगापूर
५) श्री निर्गुण पादुका = लातूर
६) श्रीपाद श्रीवल्लभ पादुका = कुरवपूर
७) श्री करुणा पादुका = कड़गंची
८) श्री स्वामी समर्थ पादुका = अक्कलकोट
९) श्रीपाद श्रीवल्लभ पादुका = पिठापूर
१०) श्री दत्त पादुका = गिरनार
११) श्रीशेष दत्त पादुका = बसव बाय कल्याण
१२) अवधूत पादुका = बाळे कुन्द्री
१३) प्रसाद पादुका = वासुदेव निवास

### गुरुपादुकांचे महत्त्व

श्री दत्तात्रेयांच्या उपासनेत अनेक ठिकाणी पादुका पूजनास महत्त्व आहे. श्री दत्तात्रेय हे गुरू स्वरूपात सर्वत्र आढळत असल्यामुळे त्यांच्या चरणपूजेचा महिमा वाढलेला आहे. दत्त संप्रदायात गुरूपेक्षा गुरुचरणांनाच महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून दत्त पंथीयात श्रीगुरू व त्यांच्या चरणपादुका यांना फार महत्व आहे. श्रीगुरूंच्या वा इष्टदेवतेच्या पादुका पूजण्याचा प्रकार फार पूर्वीपासूनचा आहे. श्रीराम वनवासात असताना भरताने त्यांच्या पादुका सिंहासनावर ठेवून आदर भाव दर्शविला होता. अतिशय प्रिय व्यक्तीविषयी, थोर व्यक्तीविषयी आदर दाखविणे म्हणजे त्यांच्या पायावर डोके ठेवणे. यातील आणखी एक रहस्य असे, की श्रेष्ठ सत्पुरुषांची सारी दैवीशक्ती त्यांच्या चरणात एकवटलेली असते. त्यांच्या चरण-स्पर्शाने कंपनाद्वारा ती शक्ती भक्तांत संचारत असल्याचा अनेकांना अनुभव आलेला आहे. म्हणूनच अनेक दत्तस्थानांत दत्त मूर्तीपेक्षा दत्तपादुकांना महत्त्वाचे स्थान मिळाले आहे.

गिरनार शिखरावर दत्तात्रेयांच्या पादुकाच आहेत.
गाणगापूर येथे श्री नृसिंहसरस्वती यांनी निर्गुण पादुकाच मागे ठेवल्याची कथा आहे.
नृसिंहवाडीलाही दत्त पादुकांचीच पूजा केली जाते.
देवगिरीवर जनार्दनस्वामींच्या समाधी स्थानी पादुकाच आहेत.
विष्णुचा जसा शाळीग्राम... तसे दत्तोपासनेत दत्तांच्या पादुकांना महत्त्वाचे स्थान आहे. या दत्तपादुकांची पूजा सगुण व निर्गुण स्वरूपात केली जाते. म्हणूनच

**'मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ।**
**तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥'**

असे नम्रपणे नतमस्तक होऊन म्हटले जाते.

### पादुकांना नमस्कार कसा करावा?

(पादुका हे शिव आणि शक्ती यांचे प्रतीक असते अन् नमस्कार करतांना त्रास होऊ नये; म्हणून पादुकांच्या खुंट्यांवर डोके न ठेवता पादुकांच्या पुढच्या भागावर डोके ठेवून नमस्कार करणे.) 'डावी पादुका ही शिवस्वरूप आणि उजवी पादुका ही शक्तीस्वरूप असते. डावी पादुका म्हणजे ईश्वराची अप्रकट तारक शक्ती आणि उजवी पादुका म्हणजे ईश्वराची अप्रकट मारक शक्ति होय.
पादुकांच्या अंगठ्यातून (पादुकांच्या खुंट्यातून आवश्यकतेप्रमाणे ईश्वराची तारक आणि मारक शक्ती बाहेर पडत असते. ज्यावेळी आपण पादुकांच्या अंगठ्यावर डोके टेकवून नमस्कार करतो त्यावेळी काही जणांना त्यातील प्रकट शक्ती न पेलवल्याने त्रास होऊ शकतो. यासाठी पादुकांना नमस्कार करताना शक्यतो डोके पादुकांच्या अंगठ्यावर न टेकवता पादुकांच्या पुढच्या भागावर (जेथे संतांच्या पायांची बोटे येतात) तेथे टेकवावे.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

# गुरुचरित्रातील रुद्राक्ष व त्यांचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुरुचरित्रातील एका कथेमध्ये श्री नृसिंहसरस्वती स्वामी ब्राह्मण स्त्रीला तिच्या मृत पतीच्या देहावर रुद्राक्ष ठेवण्यास देतात व श्रीगुरूंच्या आशीर्वादाने तिचा पती जीवंत होतो. ती ब्राह्मण स्त्री जेव्हा श्रीगुरूंना पुन्हा भेटते तेव्हा त्यांना ते रुद्राक्ष परत देते. त्यावेळी श्रीगुरू तिला रुद्राक्षाचे माहात्म्य वर्णन करतात. गुरुचरित्रात रुद्राक्षाची महिमा इतकी प्रभावीपणे सांगितली आहे, की वाचकाच्या मनात लगेच श्रद्धा आणि पवित्रतेचा अनुभव येतो.

श्री नृसिंहसरस्वती म्हणतात :

**रुद्राक्षधारणे पुण्य । मिति नाही अगण्य ।**
**आणिक नाही देवास मान्य । श्रुतिसंमत परियेसा ॥**

या ओवींमधून लक्षात येते की रुद्राक्ष धारण केल्याने मिळणारे पुण्य केवळ असीम आहे. त्या पुण्याला दुसरी उपमाच नाही. सर्व देव आणि शास्त्रही याला अत्यंत पवित्र आणि योग्य मानतात. श्रीगुरू पुढे सांगतात, की जो माणूस एक हजार रुद्राक्षांची माळ गळ्यात घालतो, तो साक्षात रुद्र होतो आणि अशा माणसाला सर्व देव वंदन करतात. जर सहस्त्र रुद्राक्ष मिळाले नाहीत, तर १०८ रुद्राक्षांची माळ गळ्यात धारण करावी. माणिक, मोती, स्फटिक, चांदी, नीलम आणि सोने यासारख्या मौल्यवान रत्नांसह रुद्राक्ष माळ बनवून श्रद्धेने धारण केल्यास रुद्राक्षाची शक्ती वाढते आणि जीवनभर पुण्य मिळते.

रुद्राक्ष फक्त गळ्यात धारण करण्यापुरते मर्यादित नाहीत. श्रीगुरू सांगतात, की ते हातांवर, दंडावर आणि मस्तकावर देखील धारण करावेत. रुद्राक्षावर केलेला अभिषेक पूजे सारखा फलदायी ठरतो. त्यामुळे रुद्राक्ष धारण करणाऱ्याच्या जीवनात मानसिक शांती, आध्यात्मिक उन्नती आणि पापमुक्ती येते.



श्रीगुरू रुद्राक्ष धारण करण्याची विशिष्ट पद्धत सांगतात-

**कंठी बांधा बत्तीस । मस्तकी बांधा चत्वारिंश ।**
**श्रवणद्वयी द्वादश । धारण करावे परियेसा ॥**

याचा अर्थ असा की गळ्यात ३२ रुद्राक्ष, डोक्यावर ४८ रुद्राक्ष, आणि कानांवर १२ रुद्राक्ष धारण करणे योग्य असते. श्रीगुरू रुद्राक्षाच्या विविध प्रकारांबाबतही सांगतात, त्यात एकमुखी, पंचमुखी, अकरामुखी आणि चतुर्दशी मुख असलेले रुद्राक्ष आहेत. प्रत्येक मुखाचा वेगळा आध्यात्मिक परिणाम असतो. योग्य रुद्राक्ष योग्य प्रकारे धारण केल्यास जीवनातील चार पुरुषार्थ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष साधता येतात. रुद्राक्ष ही केवळ साधनपूजेसाठीची वस्तू किंवा मौल्यवान अलंकार नाही, तर पुण्य, पावित्र्य आणि गुरुकृपेचे प्रतीक आहे. ते जीवनाचे रक्षण करते, पाप नष्ट करते आणि मोक्षाचा मार्ग दाखवते. जो श्रद्धा आणि भक्तीने रुद्राक्ष धारण करतो, तो जीवनातील अडचणी पार करतो, पुण्य मिळवतो आणि आध्यात्मिक प्रगती साधतो.

**भक्ति अथवा अभक्तीसी । रुद्राक्ष धारण करणारासी ।**
**पापे न लागती परियेसी । उंच अथवा नीचाते ॥**
**रुद्राक्षांचा महिमा । सांगितला अनुपमा ।**
**सांगेन विस्तारून तुम्हा । एकचित्ते परियेसा ॥**
**रुद्राक्षधारणे पुण्य । मिति नाही अगण्य ।**
**आणिक नाही देवास मान्य । श्रुतिसंमत परियेसा ॥**
**सहस्त्रसंख्या जो नर । रुद्राक्षमाळा करी हार ।**
**स्वरूपे होय तोचि रुद्र । समस्त देव वंदिती ॥**
**सहस्त्र जरी न साधती । दोही बाही षोडशती ।**
**शिखेसी एक ख्याति । चतुर्विंशति दोही करी ॥**
**कंठी बांधा बत्तीस । मस्तकी बांधा चत्वारिंश ।**
**श्रवणद्वयी द्वादश । धारण करावे परियेसा ॥**
**कंठी अष्टोत्तरशत एक । माळा करा सुरेख ।**
**रुद्रपुत्रसमान ऐक । येणे विधी धारण केलिया ॥**
**मोती पोवळी स्फटिकेसी । रौप्य वैडूर्य सुवर्णेसी ।**
**मिळोनि रुद्राक्षमाळेसी । करावे धारण परियेसा ॥**
**याचे फळ असे अपार । रुद्राक्षमाला अति थोर ।**
**जे मिळती समयानुसार । रुद्राक्ष धारण करावे ॥**
**ज्याचे गळा रुद्राक्ष असती । त्यासी पापे नातळती ।**
**तया होय सद्गति । रुद्रलोकी अखंडित ॥**
**रुद्राक्षमाळा धरोनि । जप करिती अनुष्ठानी ।**
**अनंत फळ असे जाणी । एकचित्ते परियेसा ॥**
**रुद्राक्षाविणे जो नर । वृथा जन्म जाणा घोर ।**
**ज्याचे कपाळी नसे त्रिपुंड्र । जन्म वाया परियेसा ॥**
**रुद्राक्ष बांधोनि मस्तकेसी । अथवा दोन्ही श्रवणांसी ।**
**स्नान करिता नरासी । गंगास्नानफळ असे ॥**
**रुद्राक्ष ठेवोनि पूजेसी । अभिषेक करावा श्रीरुद्रेसी ।**
**लिंगपूजा समानेसी । फळ असे निर्धारा ॥**
**एकमुख पंचमुख । एकादश असती मुख ।**
**चतुर्दशादि कौतुक । मुखे असती परियेसा ॥**
**हे उत्तम मिळती जरी । अथवा असती नानापरी ।**
**धारण करावे प्रीतिकरी । पावे चतुर्विध पुरुषार्थ ॥**


॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त॥

# श्री संत साईनाथ महाराजांच्या सजीव मूर्तीची रोचक सत्यकथा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिर्डी येथील श्री संत साईनाथ महाराजांच्या सजीव वाटणाऱ्या मूर्तीचे दर्शन करीत आहात, त्या मूर्तीविषयी फार मोठी रोचक कथा ही इतिहास जमा आहे. ७ ऑक्टोबर २०२४ मध्ये श्री साईबाबा संस्थान (शिर्डी) येथील श्री साईबाबांच्या मूर्ती स्थापनेला बरोबर ७० वर्षे पूर्ण झाली आहेत. श्री साईबाबा विश्वस्त संस्थान, शिर्डी येथे या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे. श्री साईनाथ महाराजांच्या महासमाधीनंतर तब्बल ३५ वर्षांनी ही मूर्ती स्थापन करण्याचा योग आला. १९५२ मध्ये एक पांढरा शुभ्र इटालियन संगमरवरी दगडाचा एक मोठा भाग हा त्यावेळी मुंबई येथील डॉकयार्डमध्ये आला. मात्र, तो पांढरा शुभ्र इटालियन दगड त्यावेळी तेथील डॉकयार्डमध्ये कोणी बोलावला व कोणी पाठविला? याबाबत बरेच दिवस कोणालाही काही अधिकृत माहिती प्राप्त झालेली नव्हती. आता तो मार्बलचा पांढरा मोठा दगड बरेच दिवस त्या मुंबई डॉकयार्डमध्ये तसाच पडून राहिला असल्याने तेथील प्रशासनाने त्या दगडाचा जाहीर लिलाव जाहीर केला. त्या लिलावात एका सद्गृहस्थाने तो भला मोठा संगमरवरी दगडाचा तुकडा विकत घेतला. काही काळानंतर त्या गृहस्थाला श्री साईबाबांनीच प्रचिती दिली, की तो मोठा दगड शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानाला दान करून दे. त्यानुसार त्या सज्जन व्यक्तीने बाबांच्याच आदेशानुसार तो दगड श्री साईबाबा संस्थानाला भेट दिला. त्यावेळी श्री साईबाबांची योग्य व मोठी मूर्ती मंदिरात नसल्याने तो इटालियन मार्बलचा मोठा दगड पाहून तेथील व्यवस्थापकांना असे वाटले, की बाबांच्या मूर्तीकरिता हा मार्बलचा तुकडा योग्य आहे व त्या दगडातून बाबांची सजीव व मोठी मूर्ती तयार होईल, असे त्यांना वाटले. त्यामुळे या कार्याला सजीव मूर्त स्वरूप देण्याकरिता योग्य तो कलाकारही आवश्यक होता. त्याच काळात मुंबई येथील श्री बाळाजी वसंतराव तालीम हे मूर्ती बनविण्यासाठी एक योग्य निष्णात शिल्पकार आहेत म्हणून संस्थानाला समजले. त्यामुळे संस्थानाने काहीच वेळ न करता त्यांच्याशी संपर्क केला व बाबांची मूर्ती बनविण्याचे कार्य त्यांच्यावर सोपविले. मूर्ती बनविण्याचे शिल्पकार श्री बाळाजी तालीम यांनीही त्या कार्याचा स्वीकार करून ताबडतोब मूर्ती तयार करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य लोहार व सुतार यांच्याकडून बनवून घेतली.
बाबांच्या चेहऱ्याचे स्पष्ट व सुरेख स्वरूप तेव्हा त्यांच्याकडे नव्हते म्हणून त्यांनी सुरूवातीला बाबांची मातीची एक सॅम्पल मूर्ती बनविली व आपल्या कार्याला सुरूवात केली. बाबांचा स्पष्ट चेहरा असणारी मूर्ती सुरूवातीला त्यांना बनविता आली नाही. कारण त्यांच्याकडे बाबांच्या स्पष्ट चेहऱ्याची अधिक तंतोतंत माहिती नव्हती. त्यांच्याकडे बाबांचा एक श्वेतकाळा रंगाचा फक्त फोटो होता. तो फोटो पाहूनच त्या शिल्पकाराला बाबांच्या मूर्तीला एक पक्के स्वरूप करून द्यावयाचे होते. अशा या कठीण परिस्थितीतून आपल्या कार्यात यश यावे म्हणून त्यांनी श्री साईनाथ महाराजांना आर्त हाक देऊन कळकळीची प्रार्थना केली व ते बाबांना म्हणाले, की 'बाबा माझ्याकडून हे कार्य यशस्वी होण्यासाठी मला प्रत्यक्ष दर्शन दिले तरच मला हे कार्य करणे सोपे होईल म्हणून तुम्ही मला या कार्यात यशस्वी होण्यासाठी आपले दर्शन द्या व जर तुम्ही असे केले तरच मला आपली जीवंत मूर्ती घडविता येईल व त्यामुळे आपले मूर्त जीवंत स्वरूप पाहून भक्तांना सुद्धा आनंद होईल व आपली भक्ती सुद्धा त्या माध्यमातून खूप वाढेल, बस बाबा आपण मला एवढे सहकार्य करावे.
बाबांनी त्यांची ही हाक ऐकली व तो एक दिवस उजाडला. ज्या दिवशी तो शिल्पकार बाबांच्या प्रत्यक्ष दर्शनाची जणू वाटच पाहत होता. एके दिवशी ते सकाळी सात वाजता आपल्या स्टुडिओत गेले असता त्यांनी त्या स्टुडिओत एक दिव्य प्रकाश पहिला व त्या प्रकाशातच बाबा हे प्रत्यक्ष प्रकट होऊन त्यांनी आपले स्वरूप त्या शिल्पकराला म्हणजेच श्री बाळाजी वसंतराव तालीम यांना दाखविले. श्री साईनाथ महाराजांनी श्री बाळाजी यांच्या मनात असलेल्या सर्व शंकांचे समाधान केले. बाबांनी आपल्या प्रत्येक चेहऱ्याचे वेगवेगळ्या दिशेत आपले मूर्त स्वरूप दाखविले व त्यांनी ते बाबांचे वेगवेगळ्या प्रकारचे व वेगवेगळ्या दिशांकडून बाबांच्या चेहऱ्याचे स्वरूप त्यांना प्रत्येक कोनातून दाखविले व ते त्यांनी आपल्या हृदयात जपून ठेवले. मात्र, त्याचवेळी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीमधील व्यवस्थापकांनी त्या शिल्पकाराने बाबांची जी मॉडेल मूर्ती बनविली होती. त्याच स्वरूपात त्यांना मूर्ती तयार करण्यास सांगितले. मात्र १९५४ मध्ये जेव्हा बाबांच्या मूर्तीचे कार्य अंतिम टप्प्यात आले तेव्हा त्या मूर्तीत हवेची एक मोठी पोकळी निर्माण झाली असल्याचे त्या मूर्तीकराला दिसले. म्हणून ती पोकळी हटविणे आता अगत्याचे झाले होते. ही पोकळी बाबांच्या डाव्या पायाच्या गुडघ्या खालच्या भागात निर्माण झाली होती. आता आपण जर तो कमकुवत भाग काढून टाकला तर कदाचित त्या मूर्तीतील आवश्यक भाग सुद्धा निघाला असता. त्यामुळे ती मूर्ती भग्न झाली असती व शेवटी ती मूर्ती पूजनीय सुद्धा राहिली नसती. त्यामुळे तूर्तास ते काम बंद करावे लागले. त्यामुळे त्यांनी पुन्हा श्री साईनाथ महाराजांना आपल्या आर्त स्वरूपात व आपल्या केविलवाण्या स्थितीत प्रार्थना केली व बाबांना म्हटले, की 'बाबा आपली मूर्ती तर तयार आहे. पण आता मला हे कार्य पुढे नेण्यासाठी काही अवरोध निर्माण होत आहे ते आपण दूर करावे तेव्हा तुम्ही माझ्यावर कृपा करावी.' पण त्याचवेळी त्यांना त्यांच्या अंतर्मनातुन एक आवाज आला, की 'तू आपले कार्य चालू ठेव बाकी मी बघून घेईल.' बाळजींनी आता एका सहकार्याला तो भाग काढण्यास सांगितले. त्यावेळी तो सहकारी सुद्धा ते कार्य करण्यास तयार होत नव्हता. कारण त्यालाही भीती वाटत होती, की त्यामुळे त्या मूर्तीचा गुडघ्याखालचा भाग ढासळून जाईल. त्यावेळी मुख्य शिल्पकार श्री बाळाजी यांनी त्यावेळी स्वतः आपल्या हातात छन्नी व हातोडा घेतला व तो भाग काढण्यास सुरूवात केली. पण त्यावेळी आश्चर्य असे झाले की तो भाग अगदी सहजच बाहेर तुटून पडला व मूळ मूर्तीला काहीही न होता ती जसीच्या तशीच राहिली. बाबांची ही लीला पाहून ते बाळाजी आनंदाने नाचू गाऊ लागले व नंतर त्यांनी मिठाई आणून सर्वांना तो प्रसाद खाऊ घातला.
ती एकदम सजीव दिसणारी मूर्ती पाहून त्या-त्या काळातील बाबांचे जे प्रमुख भक्त त्या काळी होते ते म्हणजे श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे व दुसरे श्री स्वामी श्री शरणानंद हे होते. त्यांनी जेव्हा ही मूर्ती पहिली तेव्हा त्यांना ती बाबांची मूर्ती पाहून खूपच आनंद झाला व आपले समाधान व्यक्त केले व लगेच त्या शिर्डी गावातून त्या मूर्तीची मिरवणूक पण काढली. त्यावेळी त्या दोघांनी म्हटले, की 'बाबा हे त्या मूर्तीच्या रुपात प्रत्यक्षच आपल्यात परत आले आहेत.' एकदा मूर्तीचे काम चालू असताना बाबांनी पुन्हा त्या शिल्पकार बाळाजी यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन सांगितले, की 'ही मूर्ती तयार झाल्यानंतर तू इतर दुसरी कोणतीही मूर्ती बनवू नकोस.'
त्याप्रमाणे बाळाजींची ही मूर्ती अखेरची ठरली व ते वयाच्या ८२ व्या वर्षी म्हणजेच २० डिसेंबरला त्यांनी बाबांच्या चरणी आपला अखेरचा श्वास घेतला.

म्हणाले, की 'बाबा माझ्याकडून हे कार्य यशस्वी होण्यासाठी मला प्रत्यक्ष दर्शन दिले तरच मला हे कार्य करणे सोपे होईल म्हणून तुम्ही मला या कार्यात यशस्वी होण्यासाठी आपले दर्शन द्या व जर तुम्ही असे केले तरच मला आपली जीवंत मूर्ती घडविता येईल व त्यामुळे आपले मूर्त जीवंत स्वरूप पाहून भक्तांना सुद्धा आनंद होईल व आपली भक्ती सुद्धा त्या माध्यमातून खूप वाढेल, बस बाबा आपण मला एवढे सहकार्य करावे.
बाबांनी त्यांची ही हाक ऐकली व तो एक दिवस उजाडला. ज्या दिवशी तो शिल्पकार बाबांच्या प्रत्यक्ष दर्शनाची जणू वाटच पाहत होता. एके दिवशी ते सकाळी सात वाजता आपल्या स्टुडिओत गेले असता त्यांनी त्या स्टुडिओत एक दिव्य प्रकाश पहिला व त्या प्रकाशातच बाबा हे प्रत्यक्ष प्रकट होऊन त्यांनी आपले स्वरूप त्या शिल्पकराला म्हणजेच श्री बाळाजी वसंतराव तालीम यांना दाखविले. श्री साईनाथ महाराजांनी श्री बाळाजी यांच्या मनात असलेल्या सर्व शंकांचे समाधान केले. बाबांनी आपल्या प्रत्येक चेहऱ्याचे वेगवेगळ्या दिशेत आपले मूर्त स्वरूप दाखविले व त्यांनी ते बाबांचे वेगवेगळ्या प्रकारचे व वेगवेगळ्या दिशांकडून



बाबांच्या चेहऱ्याचे स्वरूप त्यांना प्रत्येक कोनातून दाखविले व ते त्यांनी आपल्या हृदयात जपून ठेवले. मात्र, त्याचवेळी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीमधील व्यवस्थापकांनी त्या शिल्पकाराने बाबांची जी मॉडेल मूर्ती बनविली होती. त्याच स्वरूपात त्यांना मूर्ती तयार करण्यास सांगितले. मात्र १९५४ मध्ये जेव्हा बाबांच्या मूर्तीचे कार्य अंतिम टप्प्यात आले तेव्हा त्या मूर्तीत हवेची एक मोठी पोकळी निर्माण झाली असल्याचे त्या मूर्तीकराला दिसले. म्हणून ती पोकळी हटविणे आता अगत्याचे झाले होते. ही पोकळी बाबांच्या डाव्या पायाच्या गुडघ्या खालच्या भागात निर्माण झाली होती. आता आपण जर तो कमकुवत भाग काढून टाकला तर कदाचित त्या मूर्तीतील आवश्यक भाग सुद्धा निघाला असता. त्यामुळे ती मूर्ती भग्न झाली असती व शेवटी ती मूर्ती पूजनीय सुद्धा राहिली नसती. त्यामुळे तूर्तास ते काम बंद करावे लागले. त्यामुळे त्यांनी पुन्हा श्री साईनाथ महाराजांना आपल्या आर्त स्वरूपात व आपल्या केविलवाण्या स्थितीत प्रार्थना केली व बाबांना म्हटले, की 'बाबा आपली मूर्ती तर तयार आहे. पण आता मला हे कार्य पुढे नेण्यासाठी काही अवरोध निर्माण होत आहे ते आपण दूर करावे तेव्हा तुम्ही माझ्यावर कृपा करावी.' पण त्याचवेळी त्यांना त्यांच्या अंतर्मनातुन एक आवाज आला, की 'तू आपले कार्य चालू ठेव बाकी मी बघून घेईल.' बाळजींनी आता एका सहकार्याला तो भाग काढण्यास सांगितले. त्यावेळी तो सहकारी सुद्धा ते कार्य करण्यास तयार होत नव्हता. कारण त्यालाही भीती वाटत होती, की त्यामुळे त्या मूर्तीचा गुडघ्याखालचा भाग ढासळून जाईल. त्यावेळी मुख्य शिल्पकार श्री बाळाजी यांनी त्यावेळी स्वतः आपल्या हातात छन्नी व हातोडा घेतला व तो भाग काढण्यास सुरूवात केली. पण त्यावेळी आश्चर्य असे झाले की तो भाग अगदी सहजच बाहेर तुटून पडला व मूळ मूर्तीला काहीही न होता ती जसीच्या तशीच राहिली. बाबांची ही लीला पाहून ते बाळाजी आनंदाने नाचू गाऊ लागले व नंतर त्यांनी मिठाई आणून सर्वांना तो प्रसाद खाऊ घातला. ती एकदम सजीव दिसणारी मूर्ती पाहून त्या-त्या काळातील बाबांचे जे प्रमुख भक्त त्या काळी होते ते म्हणजे श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे व दुसरे श्री स्वामी श्री शरणानंद हे होते. त्यांनी जेव्हा ही मूर्ती पहिली तेव्हा त्यांना ती बाबांची मूर्ती पाहून खूपच आनंद झाला व आपले समाधान व्यक्त केले व लगेच त्या शिर्डी गावातून त्या मूर्तीची मिरवणूक पण काढली. त्यावेळी त्या दोघांनी म्हटले, की 'बाबा हे त्या मूर्तीच्या रुपात प्रत्यक्षच आपल्यात परत आले आहेत.' एकदा मूर्तीचे काम चालू असताना बाबांनी पुन्हा त्या शिल्पकार बाळाजी यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन सांगितले, की 'ही मूर्ती तयार झाल्यानंतर तू इतर दुसरी कोणतीही मूर्ती बनवू नकोस.'
त्याप्रमाणे बाळाजींची ही मूर्ती अखेरची ठरली व ते वयाच्या ८२ व्या वर्षी म्हणजेच २० डिसेंबरला त्यांनी बाबांच्या चरणी आपला अखेरचा श्वास घेतला.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)